ॲग्रोमेटॲडवायझरी बुलेटीन
ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
कृषि हवामानशास्त्र विभाग
कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५
फोन : ०२०-२९५१६२६४
ई-मेल : amfupune@gmail.com

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २५/०८/२०२६

## जिल्हा : सोलापूर

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२५/०८/२०२६ ते २९/०८/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| पाऊस (मिमी) | 3.0 | 2.0 | 3.0 | 2.0 | 3.0 |
| कमाल तापमान (अं.सें.) | 34 | 34 | 35 | 34 | 34 |
| किमान तापमान (अं.सें.) | 23 | 23 | 24 | 24 | 24 |
| ढग स्थिती (आकाश) | 6 | 6 | 5 | 5 | 6 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 87 | 87 | 86 | 84 | 83 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 60 | 57 | 56 | 56 | 57 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 16 | 17 | 20 | 21 | 22 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 360 | 274 | 272 | 271 | 360 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २५ ते २९ ऑगस्ट, २०२६ दरम्यान तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक २६ ऑगस्ट, २०२६ ते ०१ सप्टेंबर, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • परावर्तकांचा वापर : अवर्षणप्रवण कालावधीत सूर्याच्या उष्णतेमुळे पिकाच्या अंतरंगातून मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत असते. ते कमी करण्यासाठी केओलीन , पांढरा रंग अगर खडू पावडरचा ८ टक्के फवारा पानांवर दिल्यास सूर्यप्रकाश पानावरून परावर्तित होऊन पिकांच्या अंतरंगातून होणारी पाण्याची वाफ कमी करण्यास मदत होते. पर्यायी पाण्याची बचत होऊन अवर्षण कालावधीत ताण सहन होतो.<br>• खरीप हंगामातील रिकाम्या (नापेर) जमीनीत मूलस्थानी मृद व जलसंधारणासाठी मफुकृवि , राहुरी ने विकसित केलेले ट्रॅक्टर चलीत बंदिस्त वाफे तयार करणारे अवजार वापरून किंवा उपलब्ध यंत्राच्या सहाय्याने ६ x २ मी. आकाराचे वाफे तयार करावेत जेणेकरून पावसाचा पडणारा प्रत्येक थेंब अडवून जमिनीत जिरवला जाईल<br>• पाणी उपलब्ध असल्यास उभ्या पिकांना संरक्षित पाणी द्यावे.<br>• हुमणी कीड : हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ , बोर, लिंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावेत व रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या करावा. त्यामुळे अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट होईल. हुमणी अळीच्या जैविक नियंत्रणासाठी मेटारिझीयम ॲनिसोप्ली परोपजीवी बुरशी २० कि. प्रति हेक्टर जमिनीत मिसळावे (शेणखतामध्ये मिसळून टाकता आल्यास उत्तम).<br>• सर्व उभ्या पिकांना ढगाळ हवामानामुळे किड व रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास फुले बायोमिक्स ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी. तसेच सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असल्यास पेरणीनंतर पीक फुलोरा अवस्थेत फुले ग्रेड II ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी.<br>• गरजेप्रमाणे आंतरमशागत निंदणी/ कोळपणी करून पिक तण विरहित ठेवावे.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल ॲपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा आणि सद्यस्थितीचा विचार करता आपत्कालीन पीक नियोजन पुस्तिकेचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| ऊस | पीक वाढीची अवस्था | खोड किडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे. तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे.<br>ऊस पिकावरील पायरीला किडीचे नियमित निरीक्षण करावे. सरासरी ३ ते ५ पिल्ले किंवा प्रौढ कीड प्रति पान अथवा एका पानावर एक अंडीपुंज आढळल्यास आर्थिक नुकसानीची पातळी गाठल्याचे मानून त्वरित नियंत्रणाच्या उपाययोजना सुरू कराव्यात. आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतरच क्लोरपायरीफॉस २० टक्के ई.सी. ३० मि.ली. किंवा ॲसिफेट ५० टक्के + इमिडाक्लोप्रिड १.८० टक्के एस.पी. ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. फवारणीपूर्वी संबंधित कीटकनाशकाचे सध्याचे CIBRC लेबल-क्लेम, पीक व किडीसाठी मंजुरी तसेच लेबलवरील सूचना तपासूनच वापर करावा. |

| | | |
|---|---|---|
| सुर्यफुल | पीक वाढीची अवस्था | सूर्यफूल पिकातील शेंडे मर (बड नेक्रोसिस) हा रोग रस शोषणार्याक किडींमुळे होतो. त्याच्या नियंत्रणासाठी ईमिड्याक्लोप्रीड १७.८ एस.एल. २ मिली प्रती १० लिटर पाण्यामधून फवारणी करावी. |
| सोयाबीन | पीक वाढीची अवस्था | पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी फ्ल्यूबेंडीअमाईड ३९.३५ % एस.सी., ३ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. किडींची आर्थिक नुकसान पातळी पाहूनच फवारणी करावी.<br>जेथे रुंद सरी वरंबे (बीबीएफ) पद्धतीने सोयाबीनची ही पेरणी केली आहे तेथे बेडमध्ये साठलेली ओल पिकाला उपयोगी ठरत असल्याने पिकांची वाढ नियमित पेरणी केलेल्या सोयाबीन पेक्षा समाधानकारक असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे पुढील हंगामात सोयाबीनची पेरणी बीबीएफ पद्धतीने करण्यास प्राधान्य द्यावे.<br>ज्या शेतकऱ्यांनी रुंद सरी वरंबे पद्धतीचा अवलंब केलेला नाही अशा ठिकाणी पाण्याचा ताण जाणवत असेल तर दोन टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी कारण पावसाच्या खंडामुळे पिकाला पाण्याचा ताण जाणवत आहे. |
| मुग/उडीद/ चवळी | फुलोरा ते शेंगा भरण्याची अवस्था | मूग आणि उडीद पिकांमध्ये पावसाच्या खंडांमुळे ओलाव्याचा ताण जाणवत असेल आणि पाणी उपलब्ध असेल तर संरक्षित पाणी द्यावे अथवा २ टक्के युरिया किंवा पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.<br>मूग, उडीद, चवळी, हुलगा, मटकी या पिकांवर रस शोषणार्याल किडींच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी किंवा लेकॅनिसिलियम लेकॅनी (पूर्वीचे व्हर्टीसिलियम लेकॅनी) या जैविक बुरशीनाशकाचे मिश्रण ५ ग्रॅम प्रती लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी आणि प्रती एकर ८ ते १० पिवळे चिकट सापळे वापरावेत. |
| मका | पीक वाढीची अवस्था | किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ८-१० कामगंध सापळे प्रति एकर लावावेत. अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी स्पिनेटोरम ११.७ टक्के एससी ५ मिली किंवा ब्रोफ्लानिलाइड २० टक्के एससी २.५ मिली किंवा आयसोयायक्लोसेरॅम १८.१ एससी ६ मिली किंवा इमामेक्टिन बेंझोएट १.५ टक्के + प्रोफेनोफोस ३५ टक्के डब्लुडीजी १५ ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| तूर | पीक वाढीची अवस्था | तुर पिकामध्ये २० ते ३० दिवसानंतर तणांचा प्रादुर्भाव जाणवत असेल तर इमॅजिथायपर १० टक्के एस. एल. २ मिली प्रति लिटर या प्रमाणात तणनाशकाची फवारणी करावी आणि ओलावा व्यवस्थापणासाठी पेरणीनंतर ३० दिवसांनी दोन ओळीमध्ये सरी काढावी. तुरीच्या पिकामध्ये शेंडे खुडणी लागवडीनंतर ४५ दिवसांनी वरु न ५ सेंटीमीटर अंतरावर करावी. शेंडा खुडणी हे वाढ नियंत्रित करण्यासाठी एक प्रभावी कृषी पद्धती आहे. यामुळे पार्श्व शाखांची वाढ प्रोत्साहित होते आणि पिकाचे उत्पादन वाढते. पिकास १९:१९:१९ खताचा १ किलो प्रती २०० लिटर पाण्यातून प्रती एकर फवारणी करावी. |
| कांदा | पीक वाढीची अवस्था | रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी . तसेच मावा किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ एस.एल., ३ मिली प्रति १० लिटर या प्रमाणे पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | करपा (सिगाटोका) रोगाच्या नियंत्रणासाठी<br>*रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून जाळावीत.<br>* पहिली फवारणी २५ ग्रॅम मॅन्कोझेब ७५% डब्ल्यू.पी. किंवा २५ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० टक्के डब्लु. पी. दुसरी फवारणी प्रोपिकोनॅझोल ५ मिली + मिनरल ओईल १०० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>* कुकुंबर मोझेंक (इंन्फेक्शीअश) विषाणू रोगाच्या नियंत्रणासाठी प्रार्दुभाव दिसताच रोगग्रस्त झाड उपटून दूर ठिकाणी नेऊन जाळून किंवा जमिनीत गाडून नष्ट करावीत. या रोगाचा प्रसार मावा किडीमार्फत होत असल्याने नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रीड ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>* कंद सड जीवाणूजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी ब्लिचिंग पावडर ४ ग्रॅम प्रती १/२ लिटर पाण्यामध्ये मिसळून प्रती झाड आळवणी करावी.<br>लागवडीनंतर २ महिन्यानंतर जस्त या सूक्ष्म अन्नद्रव्याची ५० ग्रम प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| सिताफळ | पीक वाढीची अवस्था | सिताफळातील पिठ्या ढेकूण या किडीच्या नियंत्रणासाठी लेकेनोसिलियम लेकॅनी (व्हर्टीसिलियम लेकॅनी) हे जैविक बुरशीनाशक ५ ग्रॅम अधिक फिशऑईल रोझीन सोप ५ ग्रॅम किंवा मेटारायझीयम ५ ग्रॅम आणि ५ मिली दुध प्रति लिटर पाणी याप्रमाणात आर्द्रतायुक्त हवामान असताना फवारणी करावी. सिताफळ पिकातील फळमाशी व्यवस्थापनासाठी कामगंध सापळे प्रति एकरी ४ ते ५ या प्रमाणात वापरावेत. पावसाचा खंड पडल्यास बागेस संरक्षित पाणी द्यावे. |
| डाळिंब | पीक वाढीची अवस्था | हवेतील जास्त आर्द्रता आणि ढगाळ वातावरणामुळे फुलकिडे ( Thrips) आणि फळ पोखरणारी अळी ( Fruit Borer) किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने सायँट्रानिलीप्रोल १०.२६% OD (१मिली/लि) किंवा लॅम्ब्डा-सायहेलोथ्रिन ०४.९०% CS (१मिली/लि ) किंवा ब्रोफ्लानिलाईड २०% SC (२.५मिली/१०लि )चा शिफारसीनुसार फवारणीसाठी वापर करावा. पिठ्या ढेकूण (Mealybug) व खवले कीडीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५% EC (३ मिली/लि) ची फवारणी करावी . किडींची आर्थिक नुकसान पातळी पाहूनच फवारणी करावी. हस्त बहार रासाठी पाण्याच्या उपलब्धतेनुसार नियोजन करावे. |
| बोर | पीक वाढीची अवस्था | ढगाळ वातावरणामुळे भुरी रोगा च्या नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | गाय, म्हैस, शेळया व मेंढयांमध्ये आढळणा-या विषाणू जन्य लाळया खुरकत रोगाच्या नियंत्रणासाठी राज्यात प्रतिबंधात्मक लसीकरणाची नववी मोहिम १३ ऑगस्ट ते २९ सप्टेंबर या कालावधील राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत जवळपास १ कोटि २० लाख लसमात्रा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. प्रत्येक शेतक-यांनी आपल्या पशुधनाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी पशुधनाचे लसीकरण करुन घ्यावे. या लसीकरणामुळे २०३० अखेर लाळया खुरकत रोगाचे निर्मूलन करण्याच्या शासनाच्या उद्दीष्टाला निश्चितच मदत होईल. |

*टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.

स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : -
ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : २५.०८.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा
प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे